# महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना Ph.D.करण्यासाठी ५ वर्षांसाठी आर्थिक सहाय्य योजना

**योजनेचे नाव : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती(MJPRF) २०२१ (Ph.D करीता)**

## पार्श्वभूमी :

महात्मा ज्योतिबा फुले यांनी महाराष्ट्रातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे उघडण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याची चळवळ उभी केली, त्यातून बहुजन समाजाला आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रगतीच्या वाटा सापडल्या व बहुजन समाज विकासाच्या मुख्य प्रवाहाचा भाग बनला. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचार व कार्याचा हा वारसा महाराष्ट्र शासनाद्वारे पुढे नेण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या ओ.बी.सी.,बहुजन कल्याण विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील ५०० उमेदवारांना Ph.D.करण्यासाठी कमाल ५ वर्षांपर्यंत आर्थिक सहाय्य देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बार्टी, पुणे व सारथी, पुणे च्या धर्तीवर **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती (MJPRF)** ही योजना कार्यान्वित करण्याचे विचाराधीन होते त्यानुसार या योजनेअंतर्गत भारतातील मान्यता प्राप्तविद्यापीठ/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या Ph.D.करणाऱ्या महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

## योजनेचा उद्देश :

महाज्योती, नागपूर मार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/ महाविद्यालय / संस्था यामध्ये कोणत्याही विषयात पूर्णवेळ व नियमितरित्या Ph.D.करण्यासाठी कमाल ५ वर्षांसाठी अर्थसहाय्य करणे.

## लाभार्थी निकष:

१. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा तसेच इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यापैकी नॉन क्रीमिलेयर गटातील असावा.
२. उमेदवाराने पदव्युत्तर पदवी परीक्षा ही मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थामार्फत उत्तीर्ण केलेली असावी.
३. उमेदवाराने Ph.D.धारण करण्याकरिता भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थेत नोंदणी केलेली असावी. नोंदणी नसलेली व्यक्ती योजनेच्या लाभाकरिता अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.
४. उमेदवारास Ph.D. धारण करण्याकरिता यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोग/इतर सहाय्य करणाऱ्या संस्था/ महाविद्यालय/ संस्था / शासन यांचेकडून अर्थसहाय्य अथवा अधिछात्रवृत्ती मिळत असलयास या योजनेच्या लाभाकरिता पात्र राहणार नाही. (माहिती लपूवन चुकीचा लाभ घेतल्याचे आढळल्यास योग्य त्या कार्यवाहीस पात्र ठरतील)

५. ज्या उमेदवारांना सारथी कडून आर्थिक सहाय्य मंजुर झाले आहे ते विद्यार्थी या योजनेस पात्र ठरणार नाही.
६. उमेदवार Ph.D.करीत असलेल्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाचा पूर्णवेळ अथवा अर्धवेळ रोजगार / स्वयंरोजगार करीत असल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य / मानधन / शिष्यवृत्ती घेत असल्यास योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.
७. ज्या उमेदवाराने विद्यापीठ/ संस्था / महाविद्यालयात Ph.D.करीता एप्रिल २०१७ नंतर नोंदणी केलेली आहे, असे उमेदवार योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.
८. अर्ज करतांना मार्गदर्शक व संशोधन केन्द्र प्रमुखाचे संयुक्त प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

**अर्थसहाय्याचा कालावधी :**

१. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती (MJPRF) अंतर्गत Ph.D करिता निर्धारित करण्यात येत आहेत.
२. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन छात्रवृत्ती (MJPRF) चा कालावधी हा Ph.D अधिछात्रवृत्ती करिता महाज्योती कडून अर्ज मंजुरीच्या दिनांका पासून शोध प्रबंध विद्यापीठात सादर होण्याच्या तारखेपर्यंत किंवा विद्यापीठात Ph.D करीता प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून ५ वर्षांपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो कालावधी निश्चित करण्यात येत आहे.पूर्व लक्षी प्रभावाने हा लाभ देण्यात येणार नाही .
३. अधिछात्रवृत्ती उमेदवाराचा अर्ज मंजूर दिनांकापासून लागू होईल.
४. उमेदवार ५ वर्षांच्या कालावधीत Ph.D.धारण करण्यास असक्षम ठरल्यामुळे संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेने त्याकरिता मुदतवाढ दिल्यास, होणाऱ्या मुदतवाढी करिता महाज्योती मार्फत कोणत्याही परिस्थितीत छात्रवृत्ती व इतर अर्थसहाय्य देण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही.
५. उमेदवाराने कोणत्याही कारणाने नोंदणी दिनांकापासून ते विद्यापीठात Ph.D करिता रुजू दिनांकापर्यंत कालावधीत खंड घेतला तर उमेदवारास स्वयंस्पष्ट कारणासह संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थेकडून खंड प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील. संबंधित कालावधीसाठी महाज्योती मार्फत कोणत्याही परिस्थितीत अर्थसहाय्य दिले जाणार नाही.
६. उमेदवाराने Ph.D.करीता २ वर्षे पूर्ण केल्यानंतर संबंधित संस्थेतील / विद्यापीठ/ महाविद्यालय मधील मुल्यांकन समिती कडून संशोधन प्रक्रिया मुल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे.
**७.** सदर प्रक्रिया २ महिन्याच्या आत न होऊ शकल्यास संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय/ संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडून याबाबत स्वयंस्पष्ट उशीर झाल्याबाबत कारणासह अहवाल सादर करावा. अश्या परिस्थितीत पुढील कालावधी करीता शिष्यवृत्ती ही बैठकीच्या दिनांकापासून देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अर्थसहाय्य विवरण :**

| | | |
|---|---|---|
| **अधिछात्रवृत्ती** | | |
| पी.एचडी | रु. ३१,०००/- प्रति माह | |
| **आकस्मिक खर्च** | | |
| आकस्मिक खर्च- अ | रु.१०,०००/- प्रतिवर्ष | सामाजिकशास्त्रे/वाणिज्य व व्यवस्थापन / इतरशाखांसाठी |

| | | |
|---|---|---|
| आकस्मिक खर्च - ब | रु.१२,०००/- प्रतिवर्ष | विज्ञान/ अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान/ कृषी तंत्रज्ञान शाखांसाठी |
| **दिव्यांग सहाय्य भत्ता** | | |
| सहाय्यक भत्ता | रु.२०००/- प्रतिमाह<br>दिव्यांग व्यक्तीकरिता | सर्व शाखांसाठी |

टीप: शेवटच्या ६ महिन्यांचे अधिछात्रवृत्ती व इतर भत्ते हे शोध प्रबंध व तो विद्यापीठात सादर केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच देय असतील. लाभार्थ्यास Ph.D.घोषित झाल्यावर शोध प्रबंध व Ph.D.घोषित झाल्याचे प्रमाणपत्र महाज्योतीस सादर करणे बंधनकारक राहील.

**स्थलांतर:**

संशोधन करण्याकरिता विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालय यात बदल केला असल्यास त्याबाबत महाज्योतीस उमेदवाराने माहिती देणे बंधनकारक आहे तसेच असा बदल महाज्योती कडून केवळ एकदाच ग्राह्य धरण्यात येईल, त्यानंतर होणारा बदल ग्राह्य धरला जाणार नाही व त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार नाही.

**अर्थसहाय्यासाठी आवश्यक विवरणपत्रे / कागदपत्रे:**

१. **रुजू प्रमाणपत्र** : लाभार्थ्याने विद्यापीठ/ संस्था/ महाविद्यालयाचे रुजू प्रमाणपत्र (मार्गदर्शक व संशोधन केंद्र प्रमुख यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे) इतर सर्व आवश्यक कागदपत्रांसोबत महाज्योतीस सादर करावे, जे उमेदवार अंतिम निवड होण्याआधी रोजगार करीत असतील त्यांनी रोजगार करीत असलेल्या आस्थापनेने कार्यमुक्त केल्याचा अहवाल रुजू प्रमाणपत्र सोबत सादर करावा.
२. **अर्धवार्षिक प्रगती अहवाल** : लाभार्थ्याने संशोधनाचा प्रगती अहवाल नोंदणीच्या दिनांकापासून दर ६ महिन्यांनी सादर करणे आवश्यक आहे.
३. **आकस्मिक भत्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र** : लाभार्थ्याने दरवर्षी नोंदणीच्या दिनांकापासून वर्ष पूर्ण होताच आकस्मिक भत्त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
४. **मुदतवाढ प्रमाणपत्र** : विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था यांनी Ph.D.करिता मुदतवाढ दिली असल्यास मुदतवाढ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५. **हजेरी प्रमाणपत्र** : मार्गदर्शकाकडून हजेरी प्रमाणपत्र प्रमाणित करून देणे बंधनकारक आहे.
६. संशोधन अहवाल
७. संशोधन पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र / सुरु असल्याचे प्रमाणपत्र
८. Ph.D.घोषित झाल्याचे सूचनापत्र

**आरक्षण:**

१. इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील महिलांसाठी ३०% जागा आरक्षित आहे.
२. इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.), विमुक्त जाती- भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील दिव्यांगाकरिता ५% जागा आरक्षित आहे.( दिव्यांग प्रमाण — ४०% पेक्षा जास्त )

३. आरक्षणानुसार जागा वाटपाचे विवरण:

| **अनु.क्र.** | **जागाचे वाटप** | **संख्या** |
|---|---|---|
| १. | दिव्यांग – ५% | २५ |
| २. | महिला – ३०% | १५० |
| ३. | सर्वसाधारण – ६५% | ३२५ |
| | एकूण | ५०० |

एकूण ५०० उमेदवारांना Ph.D.करिता अर्थसहाय्य देण्याबाबत आरक्षण पुढीलप्रमाणे:

**सामाजिक प्रवर्ग निहाय विभागणी :**

| **अ.क्र.** | **सामाजिक प्रवर्ग** | **आरक्षित टक्केवारी** | **आरक्षित जागा** |
|---|---|---|---|
| १. | इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओ.बी.सी.) | ५९% | २९५ |
| २. | विमुक्त जाती भटक्या जमाती (व्ही.जे.एन.टी.) | ३५% | १७५ |
| ३. | विशेष मागास प्रवर्ग (एस.बी.सी.) | ६% | ३० |
| | **एकूण** | **१००%** | **५००** |

**क्षेत्रनिहाय विभागणी :**

| **अ.क्र.** | **क्षेत्र** | **आरक्षित टक्केवारी** | **आरक्षित जागा** |
|---|---|---|---|
| १. | शहरी क्षेत्र | ४०% | २०० |
| २. | ग्रामीण क्षेत्र | ४०% | २०० |
| ३. | आदिवासी क्षेत्र | २०% | १०० |
| | **एकूण** | **१००%** | **५००** |

**प्रवर्ग –क्षेत्रनिहाय विभागणी:**

| | **शहरी** | **ग्रामीण** | **आदिवासी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **इतर मागासवर्ग प्रवर्ग** | ११८ | ११८ | ५९ | **२९५** |
| **विमुक्त जाती भटक्या जमाती** | ७० | ७० | ३५ | **१७५** |
| **विशेष मागास प्रवर्ग** | १२ | १२ | ०६ | **३०** |
| | **२००** | **२००** | **१००** | **५००** |

**महिला आरक्षण विभागणी:**

| | | | **शहरी ४०%** | | **ग्रामिण ४०%** | | **आदिवासी ४०%** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **महिला** | **सर्वसाधारण** | **महिला** | **सर्वसाधारण** | **महिला** | **सर्वसाधारण** | **महिला** | **सर्वसाधारण** | |
| **इतर मागासवर्ग प्रवर्ग** | ८८ | २०७ | ३५ | ८३ | ३५ | ८३ | १८ | ४१ | २९५ |
| **विमुक्त जाती भटक्या जमाती** | ५३ | १२२ | २१ | ४९ | २१ | ४९ | ११ | २४ | १७५ |
| **विशेष मागास प्रवर्ग** | ०९ | २१ | ०४ | ०८ | ०४ | ०८ | ०८ | ०५ | ३० |
| | **१५०** | **३५०** | **६०** | **१४०** | **६०** | **१४०** | **३०** | **७०** | **५००** |

**दिव्यांग – ५% - १० जागा**

**विषय यादी व जागा विभागणी :**

१. **सामाजिक शास्त्रे :** (एकूण जागांच्या २५%) इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, संगीत शिक्षण, शारीरिक शिक्षण, लोकप्रशासन, कायदेविषयक, मानसशास्त्र, तत्वज्ञान, गृहअर्थशास्त्र, अर्थशास्त्र, इत्यादी.
२. **विज्ञान:**(एकूण जागांच्या २५%) गणित, अंकशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणीय विज्ञान,संगणकशास्त्रइत्यादी
३. **तंत्रज्ञान:** (एकूण जागांच्या २५%)कृषी, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान,अवकाश तंत्रज्ञान, आरोग्य इत्यादी.
४. **वाणिज्य व व्यवस्थापन :**(एकूण जागांच्या १५%) वाणिज्य व व्यवस्थापन इत्यादी.
५. **भाषा:** (एकूण जागांच्या १०%) सर्व भारतीय भाषा व विदेशी भाषा.

**निवड प्रक्रिया :**

१. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करावे.
२. उमेदवारांच्या कागदपत्रांच्या छाननी अंती मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.
३. उमेदवारांची विषय तज्ञांमार्फत मुलाखत घेण्यात येईल, अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना व्यक्तीशः तसेच महाज्योतीच्या संकेतस्थळावरून नावे जाहीर करण्यात येईल

**निवड रद्द करणे :**

१. चुकीची व असत्य कागदपत्रे सादर करणे.
२. उमेदवारास इतर संस्था/ विद्यापीठ/ महाविद्यालय किंवा कुठूनही संशोधन भत्ता मिळत असल्यास
३. उमेदवार योजनेचा लाभ घेताना रोजगार किंवा स्वयंरोजगार करीत असल्यास
४. उमेदवाराने कोणत्याही कारणाने मध्येच Ph.D.सोडल्यास
५. उमेदवाराची प्रगती समाधानकारक न आढळून आल्यास
६. इतर कागदपत्रे/ अहवालबाबत फसवणुकीचे वर्तन केल्यास

संपर्क :- fellowship2021@mahajyoti.org.in

भ्रमणध्वनी :- 7066888845

व्यवस्थापकीय संचालक
महाज्योती, नागपूर